हिंगोली
दि. २९.१०.२०२४

**प्रेस नोट**

**लोकसेवक १) विजय भागवत सोमटकर, वय ४२ वर्ष, व्यवसाय नौकरी, पद – तलाठी, तलाठी सज्जा बळसोंड, ता. जि. हिंगोली, वर्ग ३, रा. लाला लजपतराय नगर, अकोला रोड, हिंगोली व २) जयंतराव कृष्णराव देशमुख, वय ५९ वर्ष, रा. रामाकृष्णा सीटी, आरके स्कुल जवळ, ता. जि. हिंगोली (खाजगी इसम) यांनी ५०,०००/– रूपये लाचेची मागणी करून दिनांक २९.१०.२०२४ रोजीचे सापळा कारवाई दरम्यान ५०,०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन हिंगोली शहर, जि. हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दि. २८.१०.२०२४ रोजी तक्रार दिली की, तक्रारदार यांनी शेत गट क्र. ९६ मधील प्लॉट क्रमांक १८/१ खरेदी खताद्वारे खरेदी केलेला असुन सदर प्लॉटची नोंद ७/१२ उताऱ्यावर घेतलेली नाही. सध्या प्लॉट विक्रीसाठी सातबारा उताऱ्याची नोंदणीची आवश्यकता असल्याने तक्रारदार यांचे प्लॉटची सातबाऱ्यावर नोंद घेण्यासाठी त्यांनी दि. १६.०२.२०२४ रोजी तलाठी सज्जा बळसोंड येथे रितसर अर्ज केलेला आहे. त्यानंतर बरेच दिवस होवुनही तक्रारदाराचे फेरफार नोंदीचे काम न झाल्यामुळे तक्रारदार यांनी तहसिल कार्यालय हिंगोली व उपविभागीय अधिकारी हिंगोली यांचेकडे दि. ०१.०६.२०२४ रोजी लेखी तक्रार केली होती. त्यावर सुनावणी होवुन तक्रारदार यांच्या नावाची नियमानुसार फेरफार नोंद घेणेबाबत उपविभागीय अधिकारी हिंगोली यांनी दि. ०१.१०.२०२४ रोजी तलाठी सज्जा बळसोंड यांना आदेश दिलेला आहे. त्यानंतर तक्रारदार सदर आदेशाची प्रत घेवुन दि. २५.१०.२०२४ रोजी तलाठी कार्यालय बळसोंड येथे गेले असता तेथील तलाठी सोमटकर यांनी तक्रारदार यांचे नावाची सातबारा उतारावर नोंद घेण्यासाठी त्यांचेकडे ५०,०००/– रूपये लाचेची मागणी केली होती त्यावरून तलाठी सोमटकर लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दि. २८.१०.२०२४ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांचेकडे रितसर तक्रार दिली होती. सदर तक्रारीचे अनुषंगाने दि. २८.१०.२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता लोकसेवक १) विजय भागवत सोमटकर, तलाठी, तलाठी सज्जा बळसोंड यांनी स्वत: व आरोपी क्रमांक २) जयंतराव कृष्णराव देशमुख (खाजगी इसम) याचे मार्फतीने तक्रारदार यांचेकडे ५०,०००/– रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले, त्यावरून दि. २९.१०.२०२४ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान खाजगी इसम जयंतराव कृष्णराव देशमुख यांनी तलाठी विजय सोमटकर यांचे समक्ष लाचेची रक्कम ५०,०००/– रूपये स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडुन ताब्यात घेण्यात आले आहे. सदरचे दोन्ही आरोपी विरूद्ध पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कामगीरी मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, मा. डॉ. संजय तुंगार, अपर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांनी पोलीस निरीक्षक, श्री प्रफुल्ल अंकुशकर, श्री विनायक जाधव, सपोउपनि महमद युनुस, विजय शुक्ला, पोह/तानाजी मुंढे, रविंद्र वरणे, ज्ञानेश्वर पंचलिंगे, राजाराम फुपाटे, गजानन पवार, भगवान मंडलीक, गोविंद शिंदे, चापोह शेख अकबर, मपोह योगीता अवचार, पो.कॉ. शिवाजी वाघ, सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधावा तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**मा. संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नांदेड, मोबाईल क्रमांक ९५४५५३१२३४**
**श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली, मोबाईल कमांक ९८२२२५९९३२**
**टोल फ्रि क्रमांक १०६४, लॅन्ड लाईन क्रमांक ०२४५६–२२३०५५**

**( विकास घनवट )**
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली